**International Journal of Advance and Applied Research (IJAAR)** **ISSN – 2347-7075**
**Peer Reviewed** **Bi-Monthly** **Impact Factor – 4.082**
**Vol.4 No.2 Nov– Dec 2016**

# बँकिंग विकासातील क्रेडिट व डेबिट कार्डचे महत्व

**डॉ. धनाजी आप्पासो चौगले**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भोगावती महाविद्यालय, कुरुकली

**गोषवारा:**

बँकिंग विकासात पैसे भागवण्यासाठी किंवा येणी प्राप्त करण्यासाठी ग्राहक सध्या धनादेश व बँक ड्राफ्ट बरोबरच क्रेडिट कार्ड व डेबिट कार्डचा वापर करत आहे. ग्राहकांना क्रेडिट कार्ड द्वारे वस्तू खरेदीवर व सेवांची काही ठराविक कालावधीसाठी बँक क्रेडिट देत असते तसेच काही ऑफर्स दिल्या जातात. डेबिट कार्डमुळे 24 तास रोख पैसे एटीएम द्वारे मिळू शकतात त्यामुळे आधुनिक बँकिंग विकासात क्रेडिट कार्ड व डेबिट कार्ड यांचे महत्त्व वाढत आहे.

**प्रस्तावना:**

व्यवहार करण्यासाठी लोक चलनी नोटा व नाण्यांचा वापर करतात. बँकाच्या विकासात पैसे भागवण्यासाठी किंवा येणी प्राप्त करण्यासाठी सध्या मोठ्या प्रमाणात बदल घडून आला असून त्यासाठी धनादेश, बँक ड्राफ्ट,टेलीग्राफिक ट्रान्सफर,एनईएफटी,आरटीजीस इत्यादी बरोबर क्रेडिट कार्ड व डेबिट कार्डचा वापर केला जात आहे. एकविसाव्या शतकात वेगाने होत जाणाऱ्या या तांत्रिक बदलाचा परिणाम म्हणून येणाऱ्या काळात बायोमेट्रिक तंत्राद्वारे अथवा रेडिओ फ्रिक्वेन्सी तत्त्वावर कार्य करणाऱ्या चिपद्वारे क्रेडिट व डेबिट कार्डची जागा घेतली जाईल. भारतात क्रेडिट कार्ड व डेबिट कार्डचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्यास भारताची बँकिंग व्यवहारात व विकासात वाढ होईल.

**क्रेडिट कार्ड:**

क्रेडिट कार्ड हे एक प्लॅस्टिकचे कार्ड असते ते खाते असणाऱ्या खातेधारकांना बँकेत अर्ज करून प्राप्त करता येते. ज्याच्या आधारे वस्तू आणि सेवाची उधारीवर खरेदी करता येते त्याचे बिल क्रेडिट कार्ड देणाऱ्या बँकेमार्फत भागवले जाते अर्थात सदरची रक्कम ग्राहकास बँकेकडे ठराविक दिवसात परत करावयाची असते

ठराविक दिवस जर रक्कम भरली नसेल तर बँक त्या रकमेला व्याज आकारते. १९५१ मध्ये अमेरिकेतील फ्रॅंकलिन बँकेने प्रथम क्रेडिट कार्ड प्लॅन तयार केला. १९८० मध्ये भारतात सेंट्रल बँक ऑफ इंडियाने पहिल्यांदा क्रेडिट कार्ड प्रचलनात आणले.

**डेबिट कार्ड:**

डेबिट कार्ड हे ग्राहकाला देण्यात आलेले प्लॅस्टिकचे कार्ड असून त्याच्या द्वारे ग्राहक त्याच्या खात्यात असणाऱ्या रकमेचा वापर पैसे भागवण्यासाठी अथवा एटीएम द्वारे खात्यावरील पैसे काढण्यासाठी करू शकतो. बँकेत खाते असणाऱ्या ग्राहकास डेबिट कार्ड मिळू शकते. भारतात डेबिट कार्डचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. सर्व बँका आपल्या खातेधारकांना मागणी केल्यास डेबिट कार्ड देतात.डेबिट कार्ड साठी वार्षिक फी आकारली जाते.

**उद्दिष्टे:**

१. क्रेडिट व डेबिट कार्डचे महत्त्व अभ्यासणे

२. क्रेडिट व डेबिट कार्ड वापरताना घ्यावयाची दक्षता अभ्यासणे

**I) क्रेडिट कार्डचे महत्व:**

**१.पतपुरवठ्याचे साधन:**

आर्थिक गरजा भागवण्यासाठी चे एक सोयीचे व सहज उपलब्ध असणारे पतपुरवठ्याचे साधन म्हणून क्रेडिट कार्डचा वापर करता येतो. क्रेडिट कार्डच्या पतमर्यादेइतका वित्त चा पुरवठा क्रेडिट कार्ड वापराने तात्काळ प्राप्त करता येतो. यातून तात्काळ स्वरूपात पूर्ण करावयाच्या गरजांचीपूर्तता करता येते.

**2.ग्राहकांच्या क्रयशक्तीत वाढ:**

क्रेडिट कार्ड हे सातत्याने वापरावयाचे साधन नसले तरी ग्राहकांच्या गरजेनुसार त्यांच्या खरेदी अथवा खर्च करण्याच्या क्षमतेत तात्काळ वाढ करण्यासाठी क्रेडिट कार्ड उपयोगी पडते. क्रेडिट कार्डद्वारे ग्राहक आपल्या भविष्यकालीन प्राप्त होणाऱ्या उत्पन्न स्त्रोताचा वर्तमानकाळात त्याच्या क्रयशक्तीमध्ये वाढ करण्यासाठी उपयोग करू शकतो व आपल्या गरजा व इच्छांची पूर्तता करू शकतो

**3.जागतिक स्वीकारार्हता:**

क्रेडिट कार्डचे महत्त्व वाढविणारे त्याचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्याची जागतिक स्तरावरील स्वीकारार्हता हे होय. कार्ड वापरकर्ता क्रेडिट कार्डचा वापर जगभरात असे कार्ड वापरण्याची सुविधा उपलब्ध असेल तेथे करू शकतो प्रत्येक ठिकाणी होणारा असा क्रेडिट कार्डचा वापर त्या स्थानिक चलन बाळगण्यापासून मुक्तता देते. यामुळे जगभर प्रवास करणारे व्यावसायिक, व्यापारी व प्रवासी अशा लोकांकरिता क्रेडिट कार्ड अत्यंत उपयोगी ठरते.

**४.भुगनाचे सरल व सुरक्षित साधन:**

क्रेडिट कार्ड हे त्याच्या वापरकर्त्याला रोख रक्कम जवळ बाळगण्यापासून मुक्तता देते तसेच क्रेडिट कार्डचा वापर हा ग्रहका द्वारे त्यास प्राप्त भौतिक स्वरूपातील कार्ड तसेच ते वापरावयाचा सांकेतिक याद्वारे नियंत्रित असल्याने अशा कार्डचा गैरवापर करणे शक्य नसते यामुळेच क्रेडिट कार्ड हे भुगनाचे सरल व सुरक्षित साधन ठरते.

**५.सक्षम पत इतिहास निर्मिती:**

क्रेडिट कार्ड वापरकर्त्या ग्राहकाने केलेला क्रेडिट कार्डचा वापर त्यास एक सक्षम पत इतिहास निर्माण करण्यास मदत करतो अर्थात यात ग्राहकाने वापरलेली पत मर्यादा व वेळेवर केलेले बाकीचे भुगतान हे महत्त्वाचे ठरते सक्षम पत इतिहासाचा ग्राहकाला वित्तीय संस्थाकडून मध्यम व दीर्घ कालावधीचे कर्ज काढताना उपयोग होतो.

**६.अर्थव्यवस्थेची वाढ व विकास:**

क्रेडिट कार्डचा अर्थव्यवस्थेतील वाढलेला वापर अर्थव्यवस्थेच्या विकासाला कारणीभूत ठरू शकतो. क्रेडिट कार्डचा वापर पतपुरवठा विषयक गरजांची पूर्तता करण्यासाठी तसेच ग्राहकांची क्रयशक्ती वाढविण्यासाठी होत असल्याने, परिणामत: बाजारातील वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होते यातून उत्पादन व सेवा पुरवठा क्रियांना गती प्राप्त होते व याचा परिणाम एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढी व विकासात होतो. दुसऱ्या बाजूला क्रेडिट कार्ड वापराने देशांतर्गत रोकड विरहित व्यवहारांना चालना मिळते यामुळे आर्थिक उत्पन्न लपवो तसेच करचोरी अशा प्रकारांना आळा घालता येतो यामुळे सरकारचे कर रूपातील उत्पन्न वाढून देशाचा सकल उत्पन्नात वाढ होते.

## II) डेबिट कार्डचे महत्व:

### १.रोकड विरहित अर्थव्यवस्थेच्या निर्मितीला चालना:

अर्थव्यवस्थेत वाढत जाणारा डेबिट कार्डचा वापर हा रोकड विरहित अर्थव्यवस्थेच्या निर्मितीसाठी उपयुक्त ठरतो. कागदी चलन वापरापासून ई-चलन वापराकडे जाण्यासाठी डेबिट कार्डचा वापर वाढावा यासाठी सरकार तसेच केंद्रीय बँका प्रयत्न करीत असतात. रोकड विरहित अर्थव्यवस्थेचा उपयोग काळया पैशाच्या निर्मितीला, बनावट चलनाच्या वापराला तसेच बेकायदेशीर व्यवहारांना आळा घालण्यासाठी उपयुक्त ठरतो.

### २.रोख रक्कम बाळगणा-या पासून मुक्तता:

डेबिट कार्डचा वापर एटीएम प्रमाणे करता येत असल्याने डेबिट कार्ड ग्राहकाला रोख रक्कम स्वतःजवळ बाळगावी लागत नाही. यामुळे रोख रक्कम जवळ बाळगण्यातून उद्भवणाऱ्या धोक्यापासून जसे पैसे हरवणे पैशाची चोरी इत्यादी पासून ग्राहकाचे रक्षण होते. डेबिट कार्ड वापराचा आणखी एक फायदा म्हणजे ग्राहकाला सुट्टया पैशाच्या बाबतीत उद्भवणाऱ्यासमस्यांना तोंड द्यावे लागत नाही.

### ३.सरल भुगतान साधन:

डेबिट कार्डचा वापर ऑनलाइन व्यवहारात तसेच तात्काळ स्वरूपात भुगतान करण्यासाठी करता येत असल्याने डेबिट कार्ड माध्यमातून ग्राहक अनेक प्रकारची बिले भरणे, विमा हप्ते जमा करणे, वस्तू खरेदी करणे अशा ठिकाणी डेबिट कार्ड वापरातून तात्काळ भुकतान करू शकतो व यातून त्याच्या वेळेचाही बचत होते.

### ४.अतिरिक्त खर्चावरील नियंत्रण:

डेबिट कार्ड ग्राहकांच्या बँक खात्याशी संलग्न असल्याने ग्राहक डेबिट कार्डच्या माध्यमातून त्याच्या खात्यावर असणाऱ्या रकमेइतकाच खर्च करू शकतो. यामुळे ग्राहकाचे क्रेडिट कार्ड वापरातून शक्य असणाऱ्या अतिरिक्त खर्च करण्याच्या प्रवृत्तीपासून संरक्षण होते.

## III) क्रेडिट कार्ड आणि डेबिट कार्ड वापरताना घ्यावयाची दक्षता:

क्रेडिट कार्ड अथवा डेबिट कार्ड संदर्भातील माहिती चोरून त्याची आर्थिक फसवणूक करण्यासाठी होणारा वापर सध्याच्या काळात वाढलेला आहे या अनुषंगाने क्रेडिट कार्डव डेबिट कार्ड वापरकर्त्या ग्राहकांनी सदर कार्ड वापरताना खालील दक्षता घेणे आवश्यक आहे.

१. प्लास्टिक कार्ड स्वरूपात मिळणाऱ्या डेबिट कार्ड व क्रेडिट कार्ड वरील सर्व माहिती जसे कार्ड नंबर, कार्डची मुदत, सुरक्षा क्रमांक (सीव्हीव्ही) तसेच असे कार्ड वापरण्यासाठी ग्राहकाला देण्यात आलेला पिन अथवा वैयक्तिक ओळख क्रमांक अथवा संकेतांक ग्राहकाने गुप्त ठेवणे आवश्यक आहे तसेच वाढीव सुरक्षितेच्या दृष्टीने कार्डधारकांनी आपला संकेतांक निश्चित काळानंतर बदलत राहणे उपयुक्त ठरते.

२. डेबिट कार्ड व क्रेडिट कार्ड वापरासंबंधीचा संकेतांक वापरकर्त्या ग्राहकाने शक्यतो लक्षात ठेवावा तो कोठेही लिहून ठेवू नये तसेच याचा वापर सार्वजनिक ठिकाणी करताना हा क्रमांक इतर व्यक्ती पाहत नाहीत याची खबरदारी घ्यावी.

३. डेबिट कार्ड अथवा क्रेडिट कार्ड याचा एटीएम अथवा खरेदीच्या ठिकाणी वापर केल्यानंतर मिळणारी स्लिप अथवा पावती ग्राहकाने तेथेच टाकू नये अथवा ती काळजीपूर्वक नष्ट करावी अन्यथा त्या वरील माहितीचा गैरवापर होऊ शकतो.

४. डेबिट कार्ड व क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्या संस्था अथवा बँका कार्ड संदर्भातील कोणतीही माहिती ग्राहकाकडून मागत नाहीत त्यामुळे अशी माहिती मागण्या संदर्भात ग्राहकाला कोणाकडून ही विचारणा झाल्यास ग्राहकांनी अशी माहिती देऊ नये.

५. डेबिट कार्ड आणि क्रेडिट कार्ड प्राप्त झाल्यानंतर त्यावर नमूद केलेला बँकेचा अथवा असे कार्ड जारी करणाऱ्या संस्थेचा संपर्क अथवा मदत क्रमांक ग्राहकांनी इतरत्र टिपून ठेवावा व असे कार्ड ग्राहकाकडून गहाळ झाल्यास ग्राहकाने तात्काळ यासंदर्भात बँकेला अथवा संबंधित संस्थेला सूचित करावे आणि अशा कार्डचा होणारा गैरवापर तात्काळ थांबवावा.

६. डेबिट व क्रेडिट कार्डचा वापर ऑनलाइन शॉपिंग, साडी शॉपिंग अथवा डिजिटल पेमेंट साठी करत असताना ग्राहकांनी संबंधित संकेतस्थळ अथवा वेबसाईट वापराच्या दृष्टिकोनातून पूर्णतः सुरक्षित असल्याची खात्री करावी.

७. डेबिट कार्ड आणि क्रेडिट कार्ड संदर्भातील माहिती चोरणाऱ्या स्किमिंग यंत्राचा वापर आज वाढत असल्याने कार्ड स्वॅप करण्याच्या ठिकाणी अथवा एटीएम मिशनवर अशा कोणत्याही यंत्राच्या अस्तित्व संदर्भात ग्राहकाला संशय आल्यास त्याने अशा ठिकाणी कार्डचा वापर करण्याचे टाळावे व त्याबद्दल संबंधित संस्थेला सूचित करावे

८. डेबिट व क्रेडिट कार्ड माध्यमातून करण्यात येणाऱ्या व्यवहाराचा ग्राहकांनी ठराविक काळात मागोवा घेणे आवश्यक आहे व अशा मागोवा घेण्यातून त्याला शंकास्पद व्यवहार दिसून आल्यास त्याबद्दल त्याने तात्काळ संबंधित संस्थेला सूचित करणे आवश्यक आहे

यासंदर्भात ग्राहकांनी डेबिट कार्ड आणि क्रेडिट कार्ड माध्यमातून होणाऱ्या प्रत्येक व्यवहाराबद्दल बँकेकडून प्राप्त होणाऱ्या तात्काळ सूचना कडे लक्ष देणे उपयुक्त ठरूशकते.

**निष्कर्ष:**

जगात बँकिंग विकासाचे पाऊल म्हणून क्रेडिट कार्डव डेबिट कार्ड यांना म्हटले जाऊ शकते याचा जसा वापर वाढत गेला तसा बँकींग विकास मोठ्या प्रमाणात झालेला दिसून आला. भारतात सध्या डेबिट व क्रेडिट कार्डचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. सर्व बँका आपल्या खातेधारकांना डेबिट व क्रेडिट कार्ड त्यांच्या मागण्यानुसार देतात. आज बाजारामध्ये क्रेडिट कार्ड द्वारे खरेदी केल्यास ग्राहकांना ऑफर्स ठेवलेल्या आहेत तसेच डेबिट कार्डद्वारे सुद्धा ग्राहकांना पाहिजे तेव्हा पैसे एटीएम द्वारे केव्हाही मिळू शकतात क्रेडिट कार्ड व डेबिट कार्ड वापरत असताना ग्राहकाने आपला सुरक्षा क्रमांक, कार्ड क्रमांक, पिन क्रमांक याबाबत थोडी दक्षता घेतल्यास ग्राहकांची होणारी हानी टळू शकते एकविसाव्या शतकात क्रेडिट कार्ड व डिलीट कार्ड हे एक बँकिंग विकासातील महत्त्वाचे साधन बनलेले आहे.

**संदर्भ:**


१. S.G. Panandikar: Banking in India
२. Prasanna Chandra: Fundamentals of Financial Management
३. S. Natarajan and R. Parameswaran: Indian Banking
४. Trivedi & Shrivastava: Money Banking and Public Finance